पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक २८/१२/२०१८

# वार्तापत्र

## 'गडचिरोली पोलीस भरतीच्या नियमांत बद्ल'

महाराष्ट्र पोलीस दलातर्फे घेण्यात येणा-या पोलीस भरती करिता महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्हयासाठी पोलीस भरती नियमांत बदल केलेले असुन महाराष्ट्र शासन गृह विभाग म.रा. मुंबई यांचे आदेश दिनांक २२ मार्च २०१८ अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा २२) च्या कलम ५(ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

(इ) गडचिरोली जिल्हयातील पोलीस भरती मध्ये आवेदन अर्ज सादर करणा-या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडिया भाषेची लेखी चाचणी परिक्षा दयावी लागेल.

(फ) गडचिरोली जिल्हयामध्ये राहणा-या उमेदवारांना गडचिरोली जिल्हा पोलीस भरती मध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबंधित तहसिलदार यांनी दिलेल्या वास्तवाचा दाखला (Residential Certificate) जोडणे आवश्यक राहील.

(ग) असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बद्लीस पात्र असणार नाही.

गडचिरोली जिल्हा पोलीस दलात महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. सदर पोलीस शिपाई पदाची भरती ही गडचिरोली जिल्हयातील रहिवासी असलेल्या उमेदवारांसाठी आहे. गडचिरोली जिल्हयातील शैक्षणिक व शारिरीक पात्रतेत पात्र असलेल्या पोलीस भरतीच्या उमेदवारांनी जास्तीत जास्त संख्येने पोलीस भरती २०१९ मध्ये भाग घ्यावा. व मिळालेल्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे सो. यांनी केले आहे.